रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

मराठी विभाग २०१७-१८

मराठी भाषा गौरव दिन

## नोटीस

दि.२२/०२/२०१८

महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, दि.२७ फेब्रुवारी हा दिवस सर्वत्र 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. या मराठी राजभाषा दिनानिमित्त महाविद्यालयात सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात येणार आहे तरी जे विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छितात त्यांनी आपली नावे मराठी विभाग दि.२६/०२/२०१८ पर्यंत द्यावीत. स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या स्पर्धकांचा मा.प्राचार्यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे.

प्रा.सुहास निर्मळे
प्रमुख, मराठी विभाग

प्राचार्य

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR

रयत शिक्षण संस्थेचे,

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

मराठी विभाग -2017-18

## मराठी भाषा गौरव दिवस

दि. २७।०२।२०१८

कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. महाविद्यालयांमध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध उपक्रम घेण्यात आले. त्यामध्ये कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्याचबरोबर महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना मराठी साहित्य क्षेत्रातील मान्यवर साहित्यिकांची माहिती व्हावी यासाठी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध उपक्रम सर्वत्र राबविले जातात. हस्ताक्षर स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा विविध स्पर्धा यानिमित्ताने घेतल्या जातात. त्यामधील सुंदर हस्ताक्षर स्पर्धा महाविद्यालयात घेण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. खिलारे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सुंदर हस्ताक्षराचे महत्त्व खिलारे साहेब यांनी सांगितले. मराठी विभाग प्रमुख प्रा. सुहास निर्मळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. स्पर्धा व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.खिलारे साहेब तसेच उपप्राचार्य प्रा. देठे, मराठी विभागातील प्रा.डॉ.सिंधू आवळे यांचे सहकार्य लाभले.

विभागप्रमुख

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR